

यशवार्ता

ज्ञानगंगा घरोघरी

वर्ष १ | अंक २ | दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ | पाने १२ | खाजगी वितरणासाठी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



◆ **मार्गदर्शक**
मा. कुलगुरू प्रा. श्री. संजीव सोनवणे
मा. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

◆ **प्रकाशक**
श्री. दिलीप भरड (कुलसचिव)

◆ **संपादक मंडळ**
प्रा. डॉ. संजीवनी महाले
डॉ. गोविंद कतलाकुटे
डॉ. जयदीप निकम
प्रा. राम ठाकर
प्रा. प्रकाश देशमुख
प्रा.सज्जन थूल
प्रा. डॉ. माधुरी सोनवणे
प्रा. नागार्जुन वाडेकर
प्रा. डॉ. नितीन ठोके
डॉ. बाळासाहेब दिघे
डॉ. राजेंद्र बगाटे

◆ **संपादक**
प्रा. विजयकुमार पाईकराव

◆ **कार्यकारी संपादक**
श्री. महेंद्र बनसोडे

◆ **उपसंपादक**
श्री. सचिन तरवटे

◆ **निर्मिती**
श्री. विलास बधान

◆ **मुद्रित शोधक**
श्री. योगेश जाधव

◆ **प्रकाशचित्रे**
श्री. राजेश बर्वे

◆ **तांत्रिक सहकार्य**
श्रीमती भावना भऊरकर

◆ **सहाय्य**
श्रीमती प्रतिभा काशीद, श्री. नितीन जोंधळे

गृहपत्रिका

अध्ययनार्थी संपर्कसत्रातील शपथ

मी अध्ययनार्थी अशी विवेकपूर्ण शपथ घेतो की,

या संपर्कसत्रातील समंत्रणात माझे प्रश्न – समस्या अडचणी मांडेन.

संपर्क सत्रातील ज्ञानाचा अनुभवाचा उपयोग,

मी माझ्या स्वयं अध्ययनाबरोबरच दैनंदिन जीवनात कसोशीने व प्रामाणिकपणे करेन.

स्वावलंबन हा स्वयंअध्ययनाचा गाभा आहे.

हे समजून अभ्यासकेंद्र परिसरातील सर्व कामे, परिसर स्वच्छता मी स्वतः करेन.

संपर्कसत्रात एकत्र जमलेल्या अध्यनार्थीसी जवळीक साधून

विविध विषयांवर विचारांची देवाण - घेवाण करेन.

अभ्यास केंद्रावरील पाणी, वीज व इतर साधनांचा काटकसरीने वापर करेन.

संपर्क सत्राच्या निश्चित, निर्धारित वेळेत उपस्थित राहिल.

अभ्यास केंद्रांनी घालून दिलेल्या नियमांचे मी कटाक्षाने पालन करेन.

संपर्कसत्र माझ्या स्वयंअध्ययनातील समस्या सोडवण्याचा वस्तुपाठ होय,

त्यामधून अज्ञान, आळस, अंधश्रध्दा, अल्पसंतुष्टता, अस्वच्छता, अर्धवटपणा, विषमता, दारिद्र्य, रोगराई

इत्यादीचे निर्मूलन हेच माझे ध्येय.

ज्ञानगंगा घरोघरी, ज्ञानाचे अभिसरण निर्वेधकरी.



चलो जलाएँ दीप वहाँ, जहाँ अभी भी अंधेरा है।

दीपावलीच्या पूर्व संध्येस दीप प्रज्वलित करतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. राम ठाकर, श्री. मनोज घंटे व श्री. परेश शिऊरकर.



शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित शिक्षणक्रम

एमकेसीएल – कोल-सेमका सोबत त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगचे कॉमनवेल्थ एज्युकेशनल मिडिया सेंटर फॉर एशिया (कोल – सेमका) व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम. के. सी. एल.) यांच्यात 'शेतकऱ्यांसाठी कुत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) आधारित साक्षरता व जागृती' या मराठी भाषेतील शिक्षणक्रम संदर्भात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठातील प्रशासकीय इमारतीतील व्यवस्थापन मंडळ सभागृह येथे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, कोल-सेमकाचे संचालक डॉ. बशीरहमाद शड्रच व एम. के. सी. एल. चे महाव्यवस्थापक श्री. अमित रानडे यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

बदलता काळ व तंत्रज्ञान बघता कृत्रिम बुद्धिमता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिलेली नाही. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने या आधी शिक्षकांसाठी कुत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) वापर सुरु केलेला आहे. आता या करारामुळे राज्यातील सर्वसामान्य शेतकरी वर्गासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाची व विकासाची नवीन संधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने प्रारंभी दहा हजार शेतकऱ्यांचे उद्दिष्ट्य निश्चित केलेले आहे. मराठी भाषेसह इतर आठ प्रादेशिक भाषा व आठ आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये हा शिक्षणक्रम उपलब्ध केला जाणार आहे.

– प्रा. संजीव सोनवणे, मा. कुलगुरू

कुत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) ही आता कुणा एकाची मक्तेदारी राहिलेली नाही. कोल-सेमकाने विकसित केलेल्या या शिक्षणक्रमास ब्राजील, केनिया, सर्बिया, नायझेरिया आदी विविध देशातून मागणी आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यास स्थानिक स्तरावर मूल्यमापन व प्रमाणित करण्याचे काम करेल. त्यासाठी एम. के. सी. एल. चे तांत्रिक सहकार्य लाभेल. सदर शिक्षणक्रम हा ऑनलाईन असल्यामुळे त्यास देश – प्रदेशाची मर्यादा नाही. त्यामुळे मुक्त विद्यापीठास जागतिक परीघ प्राप्त होवू शकतो.

– डॉ. बशीरहमाद शड्रच, संचालक, कोल-सेमका

स्मार्ट मोबाईलच्या सहाय्याने शेतकरी वर्गास या शिक्षणक्रमाचा लाभ घेता येईल. आपल्या बांधावर बसून आपल्या मोबाईलद्वारे तो छोट्या छोट्या व्हिडिओ क्लिप्सच्या माध्यमातून शेतीविषयी नवीन तंत्रज्ञान, माहिती प्राप्त करू शकेल. या शिक्षणक्रमात फीडबॅक, स्वतःचे अनुभव व शेतीवर आधारित स्वतःचे व्हिडिओज देखील तो अपलोड करू शकेल. उपयोग आणि सहभाग या तत्वावर हा शिक्षणक्रम सुरु ठेवण्यात येणार आहे.

– श्री. अमित रानडे,
महाव्यवस्थापक, एम. के. सी. एल.

महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या शिक्षण – प्रशिक्षणसाठी आयोजित हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर बघण्यास मी उत्सुक आहे. भारतात नवनवीन तंत्रज्ञानाचा मोठ्या वेगाने प्रसारच नाही तर स्वीकार होत आहे. तळागाळातील लोकांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाणे व करू दिला जाणे हे निश्चितच सकारात्मक बदलाचे संकेत आहेत. त्या दुष्टीने पाहता हा शिक्षणक्रम तयार केला जाणे ही कृतीच नव्हे तर त्यामागील विचार व भावना माझ्यासाठी महत्वपूर्ण आहे.

– श्रीमती माया शर्मन,
ए. आय. शिक्षणतज्ञ, इस्त्राईली दूतावास, भारत



नांदेड विभागास सर्वसाधारण विजेतेपद

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्रीय क्रीडा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद नांदेड विभागाने पटकावले. येथील के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या पटांगणावर हा दोन दिवशीय केंद्रीय क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले तर समारोप कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे तर समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड होते.

या वेळी प्रमुख अतिथी यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वज फडकविण्यात आला. महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. संदीप बोळीज व श्वेता काळे या विद्यार्थी खेळाडूंनी क्रीडाज्योत कार्यक्रम स्थळी आणली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते केंद्रीय क्रीडा महोत्सव ज्योत प्रज्वलित करून सदर केंद्रीय क्रीडा महोत्सव उद्घाटन कार्यक्रमास सुरुवात झाली. विद्यापीठाच्या अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर व नांदेड या आठ विभागीय केंद्राच्या संघाने प्रमुख अतिथींना मानवंदना दिली.

मुंबई व अमरावती या संघांमधील व्हॉलीबॉल सामन्याने या क्रीडा महोत्सवास प्रत्यक्ष सुरुवात झाली. सदर केंद्रीय क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो - खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेबल टेनिस, बुद्धीबळ. ॲथलेटिक्स, बॅडमिंटन या खेळांच्या एकूण १८ क्रीडाप्रकारांच्या स्पर्धा झाल्या. त्यात एकूण ३८१ खेळाडू विद्यार्थी – विद्यार्थिनी सहभागी झालेले होते. प्रथम दिवशी त्यातून २३२ खेळाडू पात्र झाले. दुसऱ्या दिवशी एकूण ११७ खेळाडू निवडले गेले. यातून निवड झालेले विद्यार्थी आगामी राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. प्रमुख अतिथी यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या खेळाडू विद्यार्थ्यांना पदक, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून गौरवण्यात आले.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, विद्यापीठाच्या व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक तथा नियोजन अधिकारी डॉ. राम ठाकर, के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संपत काळे, उपप्राचार्य तुषार पाटील, विद्यापीठ विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, नाशिक

विभागीय केंद्राचे संचालक डॉ. प्रमोद रसाळ, विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक श्री. राजेंद्र वाघ, आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेत पंच म्हणून कामगिरी बजावणाऱ्या डॉ. मीनाक्षी काळे, शरद पाटील, मनीष देशमुख, आनंद काळे, क्षत्रिय, दीपक लबडे, शेखर भंडारी, चैतन्य दिवेकर, आदित्य, हेमंत काळे, ओम मोरे यांचा देखील गौरव करण्यात आला. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी गवळी यांनी केले. प्रास्ताविक विद्यापीठाच्या विद्यार्थी व बहिःशाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांनी केले. प्रमुख अतिथी यांचा परिचय श्रीमती मीनाक्षी कडेल यांनी करून दिला. विजेत्यांच्या नावाची उद्घोषणा श्री. सचिन शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. जागृती चव्हाण यांनी केले.

या क्रीडा महोत्सवातील निवड झालेल्या खेळाडूंना तज्ज्ञ प्रशिक्षकांद्वारे प्रशिक्षण देण्यात येईल. त्यासाठी विद्यापीठ मुख्यालयात खास निवासी प्रशिक्षण शिबीर आयोजीत करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील विविध खेळ व त्यातील विजेते पुढीलप्रमाणे

■ **धावणे –** १०० मीटर (मुले) – प्रथम - प्रथमेश थोरवे (पुणे), (मुली) - प्रथम – सांबर निशा (मुंबई), २०० मी. धावणे (मुले) - प्रथम - प्रथमेश थोरवे (पुणे), २०० मी. धावणे (मुली) - प्रथम – धनश्री मटके (नांदेड), ४०० मी. धावणे (मुले) - प्रथम - लिलके राहुल (नाशिक), ४०० मी. धावणे (मुली) - प्रथम - चव्हाण नंदिनी (अमरावती), ८०० मी. धावणे (मुले) – प्रथम - बेले अर्जुन (नांदेड), ८०० मी. धावणे (मुली) - प्रथम - देवकांबळे मयुरी (नागपुर), १५०० मी. धावणे (मुले) - प्रथम - ठाकरे खुमानसिंग (नाशिक), १५०० मी. धावणे (मुली) - प्रथम - काळणे रेखा (नांदेड), ५००० मी. धावणे (मुले) - प्रथम - ठाकरे खुमानसिंग (नाशिक), ५००० मी. धावणे (मुली) - प्रथम - चव्हाण नंदिनी (अमरावती)

■ **गोळाफेक-** (मुले) – प्रथम – सुजित साजणे (कोल्हापूर), गोळाफेक (मुली) – प्रथम – बनकर ऋतुजा (पुणे) ■ **भालाफेक –** (मुले) – प्रथम - बोळीज संदिप (नाशिक), भालाफेक (मुली) – प्रथम - ठाकरे अपेक्षा, (अमरावती) ■ **थाळीफेक –** (मुले) - प्रथम – सुजित साजणे (कोल्हापूर), थाळीफेक (मुली) – प्रथम – ठाकरे अपेक्षा (अमरावती) ■ **लांबउडी –** प्रथम - चिघळे ग्रीकांत (पुणे), लांबउडी (मुली) - पानसरे वैष्णवी (नाशिक), उंचउडी – प्रथम - मुस्तरी विशाल (मुंबई) ■ **उंचउडी-** (मुली) – प्रथम - रायवनबाड मोनाली (नांदेड) ■ तिहेरी उडी (मुले) – प्रथम - तांबोळी अली सबीर (पुणे), तिहेरी उडी (मुली) – गुजर वैष्णवी (अमरावती), रिले (मुले) ४×१०० - माळी मार्डड, थोरवे प्रथमेश, माने संकेत, काळे शंकर (पुणे) ■ **रिले** (मुली) ४×१०० - देवकांबळे मयुरी, सुरदासे सलोनी, फुटाणे अक्षता, मोनाली रायवनवार (नांदेड), रिले (मुली) ४×४०० - पालवे ओमकार, लिलके राहुल, कड विपक, शेंडगे समाधान, रिले (मुली) - ४×४०० - फुटाणे अक्षता, देवकांबळे मयुरी, डोईफोडे आनंदी, सटके धनश्री ■ **बुध्दिबळे** (मुले) – बानबरे चंद्रशेखर (नांदेड), बुध्दिबळे (मुली) – पतंगे संयुक्ता (अमरावती), ■ **टेबल टेनिस –** मुले - सावंत योगेश्वर (नदिड), बॅडमिंटन (मुले) – चंदनशिव यसराज (संभाजी नगर), कबड्डी (मुले) – नाशिक, कबड्डी (मुली) – नागपूर, खो-खो (मुले) – नागपूर, व्हॉलीबॉल (मुले) – नांदेड.

उद्घाटक



डॉ. मनोज रेड्डी

समारोप अतिथी



श्री. विक्रम देशमाने

शासनाच्या विविध उपक्रमांमुळे देशात 'खेलोमय' वातावरण तयार आहे. त्यातून युवा पिढीच्या आरोग्यासोबत नोकरी रोजगाराचा प्रश्नही सुटू लागल्याचे आशादायक चित्र आहे. क्रीडा विषयासंदर्भात विद्यापीठाने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. विद्यापीठाच्या आगामी नोकरभरतीत शासन निर्णयानुसार चार टक्के जागांवर खेळाडूंची भरती केली जाईल.

– प्रा. संजीव सोनवणे, मा. कुलगुरू

आयुष्यात क्रमिक शिक्षणाबरोबर खेळांना देखील तितकेच महत्व प्राप्त झालेले आहे. खेळ खेळल्यामुळे खिलाडूवृत्ती तयार होते. व्यक्तिमत्व विकास होतो. जीवनातील अपयशाला सामोरे कसे जायचे ते शिकतो. खेळ खेळल्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते. शासन विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्राप्त खेळाडूंची शासकीय सेवेत थेट भरती करत असल्यामुळे विद्यार्थी खेळाडूंनी विविध प्रकारच्या खेळांकडे केवळ खेळ म्हणून न बघता करियरची संधी म्हणून बघावे.

– डॉ. मनोज रेड्डी, क्रीडा संचालक, मुंबई विद्यापीठ.
(क्रीडामहोत्सव उद्घाटक)

खेळाच्या निमित्ताने मन आणि शरीर एकत्र येत असते. त्यामुळे खेळ हा ध्यानधारणेचा (मेडीटेशनचा) एक प्रकार आहे. ज्याचा दैनंदिन आयुष्यात व भविष्यात देखील आपल्याला एकप्रकारे उपयोग होत असतो. हल्लीची पिढी मोबाईल – संगणक यात हरवून जाते की काय अशी भीती वाटत असतांना या क्रीडा महोत्सवातील सहभागी तरुणाईस बघितल्यावर आशादायी चित्र निर्माण होते. मात्र खेळामध्ये खेळाडूची जशी प्रतिस्पर्ध्याशी स्पर्धा असते तशी ती स्वतःशी देखील असते हे प्रत्येक खेळाडूने लक्षात ठेवावे.

– विक्रम देशमाने, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
(क्रीडामहोत्सव समारोप प्रमुख अतिथी)

खेळात हार जीत सुरु असते. हरलेल्या खेळाडूंनी पुढील स्पर्धांमध्ये नव्या जोमाने उतरावे तर जिंकलेल्या खेळाडूंनी आगामी आंतरराज्य विद्यापीठ स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नाव उज्वल करावे.

– श्री. दिलीप भरड, कुलसचिव.



रोजगार निर्मिती संदर्भात ठोस पाउल


भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) सोबत करार

महाराष्ट्रात आगामी सहा महिन्यात पाच हजार नवीन रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने निर्धारित केले आहे. त्यासाठी ठोस व सकारात्मक पाऊल उचलत विद्यापीठाने भारत विकास ग्रुप (बीव्हजी), पुणे या विविध सेवा सुविधा कंपनी सोबत सामंजस्य करार केला आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सभागृहात विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व भारत विकास ग्रुप इंडिया लिमिटेडचे अप्रेंटीसशिप विभागाचे प्रमुख श्री. रवी घाटे यांनी या संदर्भातील सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

यावेळी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी सांगितले की येत्या सहा महिन्यात राज्यात पाच हजार नवीन रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट्य विद्यापीठाने निर्धारित केले आहे. त्यानुसार रोजगाराच्या शोधात अंधारात चाचपडणाऱ्या युवकांसाठी हा सामंजस्य करार आहे. या करारामुळे विद्यापीठातून दूरस्थ शिक्षण पद्धतीने पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या व घेतलेल्या विद्यार्थ्यांना आपापल्या रहिवासी क्षेत्राच्या जवळपास म्हणजे गाव – शहर किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी रोजगार – नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे, असे ते म्हणाले. विविध कामाचे स्वरूप असणारी दोन – तीन मिनिटांची व्हिडीओ क्लिप तयार करावी. त्या क्लिप्स इच्छुक संबंधित विद्यार्थ्यांना दाखवून त्या क्लीपसोबत संबंधित कामाची लिंक द्यावी. त्यावर क्लिक करून विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने संबंधित नोकरीसाठी सहज सोपा अर्ज दाखल करू शकेल, अशी सूचना देखील मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी याप्रसंगी केली.

भारत विकास ग्रुप इंडिया लिमिटेडचे अप्रेंटीसशिप विभागाचे प्रमुख श्री. रवी घाटे यांनी आपली कंपनी यांत्रिक घरकाम, लँडस्केपिंग आणि बागकाम, सिव्हिल आणि इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, फॅब्रिकेशन सर्व्हिसेस, टर्न की सोल्यूशन्स, लॉजिस्टिक सपोर्ट आणि कोणत्याही संस्थेला आवश्यक असलेल्या अनेक सेवा सुविधा क्षेत्रात कार्यरत असल्याचे सांगितले. तसेच आगामी काळात कृषी, सौरउर्जा, इलेक्ट्रिक व्हेईकल आदी क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या विविध नोकरी सेवा संधींची माहिती त्यांनी दिली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा विस्तार राज्यभर आहे. त्यामुळे या विद्यापीठाद्वारे शिक्षण घेणाऱ्या राज्यभरातील विद्यार्थ्यांना नव शिकाऊ (अप्रेंटीसशिप), प्रशिक्षण (ऑन जॉब ट्रेनिंग) किंवा इंटर्नशिप पद्धतीने नोकरीची संधी देण्यात येईल. विशेष म्हणजे आवड, कल व पात्रता बघुन विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असल्याचे श्री. घाटे यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, डॉ. राम ठाकर (संचालक व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा तथा नियोजन अधिकारी), डॉ. जयदीप निकम (संचालक निरंतर शिक्षण विद्याशाखा), डॉ. प्रकाश देशमुख (संचालक – विद्यार्थी सेवा विभाग), डॉ. प्रा. कविता साळुंखे (संचालक स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग), प्रा. नागार्जुन वाडेकर (संचालक मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा), डॉ. सुरेंद्र पाटोळे (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा), डॉ. चेतना कामळस्कर (संचालक - विज्ञान विद्याशाखा), डॉ. सज्जन थूल (मूल्यमापन विभाग), डॉ. माधुरी सोनवणे (संचालक कृषी विज्ञान विद्याशाखा), श्री. सोमनाथ जाधव (अंतर्गत गुणवत्ता आणि आश्वासन केंद्र), भारत विकास ग्रुपचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख बाळासाहेब कंकराळे, व्यवसाय विकास प्रमुख प्रमोद पवार यांची प्रमुख उपस्थित होती.





राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्ष शिष्टमंडळाची भेट

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास राज्य शासनाच्या राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाच्या (SLQAC - State Level Quality Assurance Cell) पाच सदस्यीय शिष्टमंडळाने भेट देवून विद्यापीठाच्या कामकाजाची पाहणी केली. विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुरु केलेली ब्लॉकचेन क्यूआरकोड सिस्टम, होम असाईनमेंट तसेच निर्मिती केलेली पाठ्यपुस्तके, दृक्श्राव्य साहित्य आणि कृषी विज्ञान केंद्राची माती व पाणी परीक्षण पद्धत याचे या शिष्टमंडळाने कौतुक केले. तसेच काही सूचना देखील मांडल्या. एकूणच या शिष्टमंडळाने विद्यापीठाच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.

शिक्षण क्षेत्रातील दिग्गज विभूतींचा समावेश असलेल्या या शिष्टमंडळाचे नेतृत्व नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. प्रमोद येवले यांनी केले. त्यांच्या अध्यक्षतेखालील या शिष्टमंडळात पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व धोरणात्मक अभ्यास (डिफेन्स अँड स्ट्रेटेजिक स्टडीज) विभागाचे प्रमुख व अनेक आंतरराष्ट्रीय शिक्षण प्रकल्पांवर काम केलेले ज्येष्ठ प्राध्यापक विजय खरे, अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या संगणक शास्त्र व अभियंता विद्याशाखेच्या प्रा. स्वाती शेरेकर, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. भालचंद्र वायकर व राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियान (Rashtriy Uchchatar Shikshan Abhiyan – RUSA) - रुसाचे सल्लागार तथा राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाचे नोडल अधिकारी श्री. पांडुरंग बरकले यांचा समावेश होता.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी या राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्ष (SLQAC) शिष्टमंडळाचे विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत स्वागत केले. या शिष्टमंडळा समवेत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील व्यवस्थापन मंडळ सभागृहात मुख्य बैठक झाली. त्यात राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाचे (SLQAC) अध्यक्ष माजी कुलगुरू प्रा. प्रमोद येवले यांनी सदर कक्ष निर्मितीची पार्श्वभूमी सांगितली. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वात नमूद केल्याप्रमाणे राज्यात शिक्षणाची गुणवत्ता राखून त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच निरक्षण पद्धत सुलभ करण्यासाठी राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्ष (SLQAC) गठीत करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यातील विविध विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये अपेक्षित असलेले मान्यता प्राप्त प्राचार्य/प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी आवश्यक व पुरेसा प्राध्यापक वर्ग, परीक्षा निकालाचे आदर्श वेळापत्रक, नॅक मुल्यांकन, संशोधन कार्य, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ नुसार विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्ये, अधिष्ठाता मंडळाचे अधिकार व कर्तव्ये, महाविद्यालयाचे शिक्षणविषयक लेखापरीक्षण याविषयीची देखील माहिती प्रा. प्रमोद येवले यांनी याप्रसंगी दिली. त्यानंतर उपस्थित मान्यवर यांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कामकाजाची ध्वनिचित्रफीत दाखविण्यात आली. पाठोपाठ विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी विद्यापिठाच्या एकूण कामकाजाविषयी मुद्देसूद माहिती दिली. त्यास पॉवर पॉइंट सादरीकरणाची जोड होती. त्यात विद्यापीठाचे स्थापनेपासुनचे कामकाज, यशोगाथा, विद्यापीठाने सध्या सुरु केलेलं नवीन शिक्षणक्रम, विविध व नवीन उपक्रम, आगामी योजना, विभागीय केंद्रांचे कामकाज याविषयीच्या माहितीचा समावेश होता. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील विविध वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या जीवनात कसा आमुलाग्र बदल घडून आला आहे. परिणामी महाराष्ट्राच्या प्रगतीत विद्यापीठाचे कसे योगदान आहे हे देखील मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी नमूद केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव श्री. दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, डॉ. हेमंत राजगुरू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्र (सिका - CIQA – Centre for Internal Quality Assurance) संचालक डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. बैठक यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्राचे श्री. सोमनाथ जाधव, डॉ. धनंजय मुंडे, श्रीमती ज्योती पाटील, श्रीमती ज्योती मोरे यांनी परिश्रम घेतले.

युजीसी (UGC) व डीईबी (DEB) मान्यता

नऊ शिक्षणक्रमांना युजीसी व डीईबी ची मान्यता

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) व दूरशिक्षण परिषद (डीईबी) कडून मान्यताप्राप्त नवीन नऊ शिक्षणक्रमांची सुरुवात करण्यात आलेले आहे. विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखा तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रत्येकी चार व संगणक विद्याशाखेचा एक असे हे एकूण नऊ शिक्षणक्रम आहेत.

त्यात मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखेचे एम. ए. मास कम्युनिकेशन अँड जर्नालिजम (एमसीजे - इंग्रजी माध्यम), एम. ए. मानसशास्त्र (इंग्रजी माध्यम) व एम. ए. राज्यशास्त्र (मराठी व इंग्रजी माध्यम) हे चार पदव्युत्तर शिक्षणक्रम, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे बी. बी. ए. (इव्हेंट मॅनेजमेंट) व बी. बी. ए. (अकौंटिंग अँड फायनान्सीयल मॅनेजमेंट) हे दोन पदवीस्तर तर डिप्लोमा इन ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट व वसतिगृह व्यवस्थापन पदविका या दोन पदविका शिक्षणक्रमांचा समावेश आहे. याशिवाय संगणक विद्याशाखेचा बी. एस्सी डेटा सायन्स या पदवी शिक्षणक्रम देखील त्यात आहे. विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in किंवा http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर या नवीन शिक्षणक्रमांचे Prospectus - माहिती पुस्तिका उपलब्ध आहेत.



व्याख्यान

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यशाची प्रशिक्षण भूमी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे विद्यार्थी ते प्राध्यापक अशा सर्वांसाठी एक यशस्वितेची प्रशिक्षण भूमी आहे. या विद्यापीठाने आपल्या प्रगतीमधून एक पथदर्शी मार्ग तयार केलेला आहे, आपल्या स्थापनेपासून या विद्यापीठाने अल्पकाळात जेवढी प्रगती केलेली आहे तेवढी देशातील इतर कुठल्याही मुक्त विद्यापीठाने केली नाही, असे कौतुकास्पद उद्‌गार कॅनडा स्थित कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगचे कॉमनवेल्थ एज्युकेशनल मिडिया सेंटर फॉर एशिया – कोल – सेमका चे नवी दिल्ली येथील संचालक डॉ. बशीरहमाद शड्रच यांनी येथे काढले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारत सभागृहात 'ऑनलाईन दूरस्थ शिक्षण संस्थेत पदवीधरांसाठीची रोजगारक्षमता' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव श्री. दिलीप भरड, भारतातील इस्त्राईली दूतावासातील ए.आय. शिक्षणतज्ञ श्रीमती माया शर्मन, कोल–सेमकाच्या शैक्षणिक सल्लागार श्रीमती नबीला अता, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, अंतर्गत गुणवत्ता आणि आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे आदी उपस्थित होते.

डॉ. शड्रच म्हणाले की पदवीधरांसाठीची रोजगारक्षमता दूरस्थ शिक्षण संस्थेच्या पार्श्वभूमिवर बघत असतांना या संस्थांचे उद्दिष्ट्य, ध्येय धोरणे, कृती आराखडा, अपेक्षित निकाल यांचा देखील अभ्यास होणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाची रोजगाराशी सांगड घालणे सोपे ठरणार आहे. पारंपारिक शैक्षणिक संस्था व विद्यापीठांच्या तुलनेत ऑनलाईन दूरस्थ शिक्षण पद्धतीने शिक्षण देणाऱ्या मुक्त विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क हे परवडणारे आहे. त्यातूनच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षित करून रोजगाराभिमुख करणे सोपे जात असल्याचे मत डॉ. शड्रच यांनी व्यक्त केले.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की प्रगतीचे शतक म्हणवणाऱ्या २१ व्या शतकातील आता २५ वर्षे होत आली आहेत. जगाच्या भारताकडून अपेक्षा वाढलेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपण विचार करायला हवा. सन २०४७ पर्यंत विकसित भारत हे आपणा सर्वांचे ध्येय आहे. त्यामुळे दैनंदिन आयुष्यातील अडचणी व समस्यांवर मात करत आपल्याला नवीन तंत्र अवगत करावे लागणार आहे. पारंपारिक शेतीची पद्धत बदलावी लागेल, नोकरी व्यवसायाच्या नवीन संधी शोधाव्या लागतील. नवीन समस्या भेडसावू पाहत आहेत त्यांना त्या पद्धतीने सोडवावे लागणार आहे. शैक्षणिक व रोजगार संबंधी मुक्त विद्यापीठ हे कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगचे कॉमनवेल्थ एज्युकेशनल मिडिया सेंटर फॉर एशिया - कोल–सेमका सोबत भरीव कार्य करेल असे आश्वासन त्यांनी दिले.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे ऑनलाईन व्याख्यान

भविष्यात भारताचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे व स्वतंत्र भारतात लोकशाही रुजली पाहिजे, बळकट झाली पाहिजे या हेतूने भारताचे तत्कालीन प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी स्वतंत्र भारतातील शिक्षणपद्धतीची सुरुवात केली, असे प्रतिपादन शिक्षण व्याख्याते श्री. संदीप वाकचौरे यांनी केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे शिक्षणदिन निमित्त 'मौलाना आझादांचा शिक्षण विचार आणि भारतीय शिक्षण' विषयी दुरदृश्य प्रणाली (ऑनलाईन) पद्धतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

यावेळी बोलतांना श्री. वाकचौरे पुढे म्हणाले की मौलाना अबुल कलाम आझाद हे उदारमतवादी शिक्षणतज्ञ होते. केवळ साक्षर व्यक्तींनाच मतदानाचा अधिकार असावा अशी मागणी जेव्हा होत होती तेव्हा त्यांनी प्रौढ साक्षरतेची मागणी करतांना लोकशाहीत प्रत्येकालाच मतदानाचा अधिकार असायला हवा अशी भूमिका घेतली. केवळ शिक्षण व मेहनतीने आर्थिक सुबत्ता येवू शकते असे मत त्यांनी मांडले होते. शिक्षणात आधुनिक शिक्षण, तत्वज्ञान व साहित्य यांचा देखील समावेश असायला हवा अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. सर्व धर्मातील स्त्रियांना देखील पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे आग्रही प्रतिपादन असायचे. सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे याचा त्यांनी वारंवार पुनरुच्चार केलेला होता. शिक्षणसंस्थांना आधुनिक साधने पुरविली पाहिजेत, विद्यार्थ्यांना तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण दिले पाहिजे, भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे कृषीचे शिक्षणही तितक्याच क्षमतेने दिले गेले पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा. भारतातील दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या गोरगरीबांसाठी रात्रशाळा सुरु करण्यात यावी हा विचार देखील मौलाना अबुल कलाम आझाद यांनी मांडला



असल्याचे व्याख्याते श्री. वाकचौरे यांनी सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की स्वतंत्र भारताचे प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान व दिशादर्शन उल्लेखनीय व महत्वपूर्ण होते. त्यातूनच पुढे भारतात आयआयटी, एनसीईआरटी, युजीसी, विविध विद्यापीठे या सारख्या उच्च शिक्षणसंस्था व शिक्षण केंद्रे तयार झाली. भारतीय समाज हा त्यांच्या शिक्षण धोरणाच्या केंद्रास्थानी होता. आताच्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे परीक्षेचे अवास्तव महत्व कमी होईल, प्रत्येक अध्ययन विषयांमध्ये निर्माण झालेल्या मर्यादेच्या भिंती नाहीशा होवून ज्ञानाधिष्ठीत भारतीय समाज व पिढी तयार होवून देश प्रगतीपथावर जाईल असा विश्वास देखील मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी व्यक्त केला.

यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहिःशाल केंदाचे प्रमुख डॉ. दयाराम पवार उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका तथा व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले यांनी केले. या दुरदृश्य प्रणाली व्याख्यान सत्राचे संयोजन, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले.

पुस्तक प्रदर्शन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर या दिवशी ' शिक्षण अधिष्ठान, विकास व विस्तार ग्रंथ प्रदर्शन' या उपक्रमांतर्गत अनोखे पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील संगणक सभागृहात हे पुस्तक प्रदर्शन संपन्न झाले.

या पुस्तक प्रदर्शनात जवळपास शंभरच्यावर दुर्मिळ व नाविन्यपूर्ण पुस्तके प्रदर्शित करण्यात आली. त्यात शिक्षण अधिष्ठान विषयी २०, शिक्षण विकास व शिक्षण विस्तार विषयी प्रत्येकी ४० पुस्तके होती. याशिवाय भारतीय राज्यघटना, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी लिखित 'एक्झाम वॉरियर', नवीन शैक्षणिक धोरण – २०२०, शैक्षणिक धोरण – १९८६, विद्यापीठ कायदा, राज्य अभ्यासक्रम आराखडा – २०२४, शालेय व प्रारंभिक शिक्षण, मुलभूत शिक्षण, एनसीईआरटी पुस्तके, राज्यशासन व एनसीटी यांची १९७८ ची प्रारूप पुस्तके, युजीसीची पुस्तके व महत्वपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे, यशवंतराव



चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची शिक्षकांसाठी विस्तार, शिक्षणक्रम, कार्यवाही, उपक्रम, स्वाध्याय, समंत्रणसंबंधी आदी उपयुक्त असलेल्या पुस्तकांचा समावेश होता. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. डॉ. संजीवनी महाले, प्रा. राम ताकवले संशोधन व विकासकेंद्राच्या इमेरिटस प्रोफेसर डॉ. कविता साळुंखे यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक, अधिकारी – कर्मचारी, विद्यार्थी यांनी या अनोख्या पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला.



ताल से ताल मिला...
दीपावली संध्या कार्यक्रम संपन्न

सांजवेळेचा अलगदसा गारवा, खुले मैदान अन वर मोकळ्या आकाशात नक्षत्र - शतताराकांची गर्दी, खाली नैसर्गिक हिरवेगार गालिचे, रंगमंचावर पणत्यांच्या दिव्यांची रोषणाई, विविध रंगांनी सजवलेली रांगोळी, झेंडूच्या फुलांच्या माळांनी व गुलाबाच्या पुष्पगुच्छांनी आलेली उत्सवी रूप, नेत्रदीपक रोषणाईच्या माळांनी आलेली झळाळी, आणि समोर 'ताल से ताल मिला.... अशी ताल सुरांची जुगलबंदी नव्हे तर मेळ. निमित्त होते यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आयोजित दीपावली संध्या या संगीतमय मैफलीचे.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून गेल्या वर्षापासून या 'दीपावली संध्या' उपक्रमास सुरुवात झाली. विद्यापीठाच्या रम्य व सुंदर अशा परिसरात, ग्रंथालय 'ज्ञानस्त्रोत' लगतच्या खुल्या रंगमंचावर (अम्पी थिएटर) दीपावलीच्या प्रथम दिवशी वसुबारसला नाशिकच्या दसककर भगिनी यांचा 'ताल सुरन का मेल' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन,नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, साउथ वेस्टर्न युनिवर्सिटी नॉर्वेचे शिक्षणतज्ञ डॉ. आसमंठ आमाध, पोलीस उपअधीक्षक श्री. ढिकले, पोलीस निरीक्षक श्री. दिलीप खेडकर, गोवर्धन गावाचे सरपंच श्री. गोविंद डंबाळे, उपसरपंच बाळासाहेब लांबे, माजी सरपंच पी. के. जाधव, विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या घनशेत गावाचे सरपंच श्री. रवी चौधरी, माजी सरपंच श्री. विनायक महाले, माजी सरपंच कैलास चौधरी, पत्रकार सर्वश्री योगेश रोकडे, मुकुंद बाविस्कर, धनंजय बोडके, सुशांत किर्वे आदी मान्यवर यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व रंगमंचावरील दिवे प्रज्वलित करून कार्यक्रमास सुरुवात झाली. सौ. अश्विनी दसककर भार्गवे, कु. ईश्वरी दसककर, कु.गौरी दसककर कु. सुरश्री (पूजा) दसककर यांनी मैफलीची सुरुवात श्रीगणेश वंदन व श्रीलक्ष्मी वंदनने केली. त्यानंतर आपल्या लौकीकास साजेल अशा पद्धतीने स्वरांमध्ये रमणाऱ्या या चौघा भगिनींनी हार्मनी म्हणजे वेगवेगळ्या स्वरातील परंतु एका सुरात विविध रचना सादर करून उपस्थित श्रोते रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यात प्रामुख्याने अभिजात संगीतापासून भक्तीगीत, भजन, रागमाला, फ्युजन, पाश्चिमात्य सिम्फनी, सिनेसंगीत यांचा समावेश होता. पंडित सुभाष दसककर (संवादिनी), ओंकार अपस्तंभ (तबला), मल्हार भार्गवे (सिंथेसायझर) यांनी साथसंगत दिली. निवेदन प्रज्ञा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे सहयोगी सल्लागार श्री. दत्ता पाटील यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक, प्रशासकीय अधिकारी – कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते.

प्रकाश चित्रवृत्त



क्रांतिकारक बिरसा मुंडा जयंती साजरी



माजी पंतप्रधान पंडित नेहरू जयंती



माजी पंतप्रधान इंदिरा गांधी जयंती



ज्ञान स्त्रोत केंद्रात दिवाळी अंक प्रदर्शन उद्घाटन



क्रीडा महोत्सव उद्घाटन



क्रीडा महोत्सव थरारक क्षण

निवड

शैक्षणिक संयोजकांचे राष्ट्रीय संशोधन लेख स्पर्धेत यश

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सहा शैक्षणिक संयोजक यांच्या वेगवेगळ्या विषयांवरील सहा संशोधनपर लेखांची राष्ट्रीय स्तरावरील 'व्हिजन फॉर विकसित भारत (विविभा) २०२४' या संशोधन लेख स्पर्धेत 'उत्कृष्ट संशोधनपर लेख' म्हणून निवड झाली आहे. भारतीय शिक्षण मंडळ, पुणे तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव श्री. दिलीप भरड, इमेरिटस प्राध्यापक डॉ. कविता साळुंके यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

विद्यापीठातील राजकुमार बाबुराव ननवरे (शिक्षणशास्त्र विद्याशाखा), सचिन अशोक पोरे (प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र), प्रमोद दत्तात्रय वाघ व धम्मरत्न श्रीराम जावळे (मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा), घनःश्याम साहेबराव पाटील (स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग) आणि योगेश भाऊसाहेब वाघडकर (संगणक विद्याशाखा) अशी या सहा स्पर्धक शैक्षणिक संयोजकांची नावे आहेत. त्यांनी या स्पर्धेसाठी बीएड



पाठ्यक्रम, भारतीय शिक्षण पद्धत, हायड्रोथर्मल सिस्टम, भारतीय कथाशैली, सूर्यनमस्काराचे परिणाम अशा वैविध्यपूर्ण विषयांवर स्वतंत्ररित्या संशोधनपर लेख प्रस्तुत केले होते. बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठाच्या आवारात भारतीय शिक्षण मंडळाच्या युवा आयाम, पश्चिम महाराष्ट्र प्रांततर्फे आयोजित कार्यक्रमात यशस्वी स्पर्धकांची नावे जाहीर करण्यात आली. विकसित भारताचा पाया घडवण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी आणि परिवर्तनकारी योजना उभारण्याच्या उद्देशाने 'विविभा २०२४' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात राज्यातील जवळपास सर्व विद्यापीठातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

वृत्तपत्र कात्रण कोलाज

पुस्तक परीक्षण

रवींद्र मालुंजकर, 9423090526

व्यासंगी प्रशासकाची मनोहारी स्मृतिगाथा

थोर शिक्षणतज्ज्ञ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या प्रथम स्मृतिदिनी त्यांच्या सहवासात आलेल्या आणि सहकारी म्हणून कार्य केलेल्या सुहृदांनी लिहिलेल्या स्मृतिलेखांचा 'प्रा. राम ताकवले स्मृतिगाथा' हा ग्रंथ नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रा.राम ताकवले संशोधन केंद्राने प्रकाशित केला आहे. या केंद्राच्या संचालक प्रो. कविता साळुंखे आणि प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी संपादित केलेल्या या स्मृतिग्रंथाला मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना तर प्र-कुलगुरू प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांचा मौलिक संदेश लाभला आहे. देशाबद्दल नितांत प्रेम, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी, विज्ञाननिष्ठा, कर्तव्यनिष्ठा, वैविधांगी प्रयोगशीलता, सकारात्मक कल्पकता, विधायक दृष्टिकोन, अथकश्रांत परिश्रम वृत्ती असे ताकवले सर या स्मृतिग्रंथातून लौकिकार्थाने भेटतात. या ग्रंथात एकूण ७४ लेख आहेत. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा.ग.प्र.प्रधान, प्रा.श्रीधर गुमे, भाई वैद्य, डॉ.उत्तम भ सुधीर गव्हाणे, भालचंद्र कडके, यदुनाथ थत्ते, डॉ.अरुण निगवेकर, विवेक स रमेश बारखेडे, मुकुंद टाकसाळे, प्रा.विजयकुमार पाईकराव, डॉ.प्रवीण घोडेस्वा भालेराव, डॉ.स्नेहल बायकोस, वर्षा बहिरम, डॉ.अनिता महाले यांच्यासह क यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाशझोत टाकतात.



कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांचा सत्कार करताना डॉ. नारायण मेहरे

विद्यापीठ विकासासाठी प्रयत्नशील राहा

कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांचे आवाहन

य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्रास भेट

नागपूर, १४ नोव्हेंबर

विद्यापीठाच्या सर्वांगीण ...साठी व गुणवत्ता वाढीसाठी ...अधिकारी, कर्मचाऱ्यांनी

रोजगारासाठी 'मुक्त'चे पाऊल

भारत विकास ग्रुपसोबत सामंजस्य करार



संधी • महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा सेवा सुविधा कंपनीसोबत करार

पदवीच्या ५ हजार पात्रताधारक विद्यार्थ्यांना ६ महिन्यांत रोजगार

रहिवासी क्षेत्राजवळ विद्यार्थी करू शकतात अर्ज

पात्रता बघून निवड

मुक्त विद्यापीठाचा विस्तार राज्यभर आहे. त्यामुळे या विद्यापीठाशी निगडित देशभरच्या राज्यभागातील विद्यार्थ्यांना नव नियोक्ता (असेटमालक), प्रशिक्षण (अँन जॉब ट्रेनिंग) किंवा इंटर्नशिप पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवड, कल व पात्रता बघून निवड केली जाणार आहे.

विविध संधी उपलब्ध

भारत विकास ग्रुप ही एक विश्वासार्ह कंपनी आहे. ती शिक्षण, लॉजिस्टिक्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात काम करते. या कंपनीच्या विविध प्रकल्पांमध्ये, जसे की वीजनिर्मिती, पॉवर ट्रान्समिशन, रेल्वे सोलापूरमध्ये सोलर आणि पवनचक्की यांसारख्या अक्षयऊर्जा प्रकल्पांमध्ये अनेक सेवा सुविधा केंद्रात कार्यरत आहे. आपली कारकीर्द घडवण्यासाठी ही संधी उपलब्ध होईल.

मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आता मिळणार रोजगार



आपली सात महिन्यांत राज्यात पाच हजार नवीन रोजगारनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने निर्धारित केले आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधीत असलेल्या व नोकरी बाचरहाऱ्या युवकांसाठी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. - प्रा.संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

मुक्त विद्यापीठाचे राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सव स्पर्धेत यश



लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । यशवंतराव चव्हाण म्हाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने 'इंद्रधनुष्य - २०२४' या म्हाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत संगीत विभागात तालवाद्य प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला. मानतीय राजभवन (महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार दिनांक नोव्हेंबर २०२४ दरम्यान अकोला येथील डॉ. पंजाबराव विद्यापीठ येथे हा युवा महोत्सव संपन्न झाला. त्यात विद्यार्थी सौरभ बापू वंजारी याने हे यश मिळवून दिले पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती शिरीजा प्रभू यांच्या हस्ते कौतुक

'मुक्त'च्या नऊ विद्यार्थ्यांचे नेटमध्ये यश

नाशिक, ता. ३० : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या नऊ विद्यार्थ्यांनी नेट परीक्षेत यश मिळविले. विद्यापीठ अनुदान आयोगाने जूनमध्ये ही परीक्षा घेतली होती.

नेट परीक्षेत विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या एमए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाचे २०२२-२०२४ या तुकडीचे नऊ विद्यार्थी कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी पात्र ठरला. उर्वरित आठ विद्यार्थी सहाय्यक प्राध्यापक आणि पीएच. डी.साठी पात्र ठरले आहेत. सिकंदर पवार (नाशिक), अशोक बागले (नंदुरबार), अभिषेक कानडे (अमरावती), अंजुश्री वीरकर (सातारा), प्रदीप इंगळे (खामगाव), मोहसीन सय्यद, प्रवीण शिंदे, अविनाश नवसारे (तिघेही भिगवण, इंदापूर) यांचा समावेश आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे,

लोकमत



शेतकऱ्यांसाठी नवीन अभ्यासक्रमाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना मान्यवर उपस्थित होते.

मुक्त विद्यापीठ देणार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे धडे

...र : पुढील महिन्यापासूनच होणार सुरुवात

'मुक्त'मध्ये ऑनलाइन काव्योत्सव मैफल

नाट्यशास्त्र विभागाच्या कवींचे सादरीकरण

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण शाखेंतर्गत कुलगुरू डॉ. सोनवणे यांच्या मार्गदर्शनार नाट्यशास्त्र विभाग दिवाळीनिमित्त ऑनलाइन काव्यो मैफलीचे आयोजन करण्यात आ नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रमाच्या २५ विद्यार्थ्यांनी मराठी - हिंदी, नाट्य दिग्दर्शक सचिन शिंदे यांनी संयोजन केले.

UGC-DEB approves nine new courses at YCMOU

Admissions begin; November 15 is last date for applyin

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 9

The Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) has received approval from the UGC Distance Education Bureau (UGC-DEB) for nine new courses. The process for online admissions to these courses for the academic year 2024-2025 has begun at the various study centres of the university across Maharashtra. The last date for admissions is November 15, 2024. Interested students can secure their admission by paying the required fees within this period, informed



University Registrar Dilip Bharad.

The nine new courses include four courses each from the Humanities and Social

Students interested in ...uate courses under Hu... ...ities and Social Science...

विद्यार्थ्यांनी खेळातून व्यक्तिमत्त्व विकास साधावा



मुक्त विद्यापीठातर्फे भंडारे यांचा सत्कार



नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे विद्यापीठाचे अक्षरजुळवणीकार (डी. टी. पी. ऑपरेटर) दिलीप भंडारे यांचा सेवापूर्तीनिमित्त सहकुटुंब सत्कार करून निरोप देण्यात आला. विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात झालेल्या या पारिवारिक सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव